**वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा.**

२९ ऑगस्ट हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा वाढदिवस, राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडमध्ये  मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन मा. प्राचार्य एस आर सरोदे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य एस आर सरोदे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या आठवणींना उजाळा देत मेजर ध्यानचंद यांनी त्या वेळीच्या बिकट परिस्थितीत देखील भारताला तीन वेळा ऑलिंपिक गोल्ड मेडल मिळवून दिले यांचा आदर्श आताच्या मुलांनी घ्यावा व आपले व आपल्या महाविद्यालयाचे नाव मोठे करावे अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाविद्यालयाचे जिमखाना उपाध्यक्ष , सांस्कृतिक विभाग प्रमुख, पर्यवेक्षक शारीरिक शिक्षण संचालक त्याचबरोबर प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.